आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१ एप्रिल २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- बँकिंग पद्धती सुलभ होण्यासाठी धोरण निश्चितीची गरज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मुंबईत प्रतिपादन / रिझर्व बँकेच्या ९० व्या स्थापना दिनानिमित्त ९० रुपयांच्या विशेष नाण्याचं केलं लोकार्पण

- निवडणुकांच्या काळात काँग्रेसकडून जबरदस्तीने आयकर वसुली करणार नसल्याचं केंद्र सरकारच्या वतीनं सर्वोच्च न्यायालयात निवेदन

- राज्यात आजपासून नवीन वीज दर लागू

- शेअर बाजारात नव्या आर्थिक वर्षाची सुरूवात तेजीनं /दोन्ही निर्देशांकांनी गाठली ऐतिहासिक उंची

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज वानखेडे स्टेडिअमवर मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स यांची लढत

**<><><><><><>**

देशातल्या सर्व क्षेत्रातल्या नागरिकांना, व्यावसायिकांना सोयीनुसार आणि गरजेनुसार बँकिंग करता यावं तसंच बँकिंगच्या पद्धती सुलभ होण्यासाठी धोरण निश्चितीची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. रिझर्व बँकेच्या ९० व्या स्थापना दिनाच्या निमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डिजिटल व्यवहारांना प्राधान्य देताना रोखे विरहित व्यवहारांमधून होणाऱ्या बदलांकडे लक्ष देण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड प्रधानमंत्री**

सर्वसमावेशक प्रगतीसाठी विभिन्न क्षेत्रांची भविष्यातील गरज ओळखून काम करण्याची आणि अभिनव संकल्पना राबवण्याची शिफारस प्रधानमंत्र्यांनी रिझर्व्ह बँकेला केली. गेल्या १० वर्षात देशातल्या बँकिंग व्यवस्थेत झालेल्या बदलांचा आढावा त्यांनी भाषणात घेतला. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ९० रुपयांच्या विशेष नाण्याचं लोकार्पण झालं.

कोरोना काळात रिझर्व्ह बँकेनं उचललेल्या पावलांचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कौतुक केलं. त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेला, बँकांना आणि चलनवाढ आटोक्यात आणण्याला फायदा झाल्याचं त्या म्हणाल्या. वित्तीय क्षेत्राला बदलत्या काळानुसार सुसंगत करण्यासाठी रिझर्व्ह बँक कार्यरत असल्याचं गव्हर्नर शक्तीकांत दास यावेळी म्हणाले.

**<><><><><><>**

निवडणुकांच्या काळात काँग्रेसकडून जबरदस्तीने आयकर वसुली करणार नसल्याचं निवेदन केंद्र सरकारच्या वतीनं देशाचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान दिलं. येत्या जुलै महिन्यापर्यंत आयकर विभागाच्या ३ हजार ५०० कोटी रुपयांच्या कर थकबाकीची वसुली केली जाणार नाही असंही त्यांनी निवेदनात म्हटलं आहे.

केंद्र सरकारनं न्यायमूर्ती बीव्ही नागरत्ना आणि न्यायमूर्ती ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठासमोर हे निवेदन दिलं. या याचिकेची पुढची सुनावणी २४ जुलै रोजी होणार आहे.

**<><><><><><>**

महिलांविषयी अवमानकारक उद्गार काढल्याबद्दल आज निवडणूक आयोगानं भाजपा खासदार दिलीप घोष आणि काँग्रेस नेते सुप्रिया श्रीनेत यांची कानउघाडणी केली. घोष यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी

यांच्याविरोधात तर श्रीनेत यांनी भाजपाच्या लोकसभा उमेदवार कंगना रानौत यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. या दोघांनी वैयक्तिक टीका केली असून त्यामुळे आचारसंहितेतल्या तरतुदीचं उल्लंघन झाल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

या अनुषंगानं भाजपाध्यक्ष जगतप्रकाश नड्डा आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना केंद्रीय निवडणूक आयोगानं नोटीस बजावली आहे. लोकसभा निवडणूक काळात दोन्ही पक्षांमधल्या नेत्यांच्या विधानाबाबत काळजी घ्यावी आणि दक्षता राखावी यासाठी ही नोटीस बजावली आहे.दोन्ही पक्षाच्या अध्यक्षांनी आपापल्या नेत्यांना आदर्श आचारसंहितेच्या नियमांचं उल्लंघन करण्यापासून रोखावं, असं आयोगानं बजावलं आहे.

**<><><><><>**

**परभणी** लोकसभा मतदारसंघासाठी राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते आणि महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार उपस्थित होते. गेल्या दहा वर्षांत देशाचा विकास करणाऱ्या नरेंद्र मोदी यांनाच तिसऱ्यांदा प्रधानमंत्रीपदी आणण्यासाठी सर्वांनी एकजुटीनं महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्यायचं आहे, असं अजित पवार यांनी सांगितलं. जानकर यांनी अर्ज दाखल करण्यापूर्वी आयोजित सभेत ते बोलत होते. मागच्या निवडणुकीत 41 खासदार महाराष्ट्रानं मोदींच्या झोळीत टाकले, यावेळी अधिक खासदार पाठवणार आहोत, त्यात पंकजा मुंडे आणि महादेव जानकर असतील, असं देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले.

**हिंगोली** लोकसभा मतदारसंघासाठी आज अभिनव भारत जनसेवा पक्षाचे रवी जाधव यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे आतापर्यंत दाखल अर्जांची संख्या दोन झाली आहे. **नांदेड** लोकसभा मतदारसंघासाठी काँग्रेसतर्फे वसंत चव्हाण, तर अपक्ष म्हणून महारुद्र पोपळाईतकर यांनी अर्ज दाखल केले. आतापर्यंत एकूण पाच अर्ज दाखल झाले आहेत. **बुलढाणा** लोकसभा मतदारसंघात आज माजी आमदार विजयराज शिंदे यांनी आज अपक्ष म्हणून आणि भाजपाच्या वतीनं उमेदवारी अर्ज भरला. आत्तापर्यंत ११ उमेदवारांनी २७ अर्ज दाखल केले आहेत.

**<><><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीनं ११ उमेदवारांची दुसरी उमेदवार यादी काल जाहीर केली, त्यात मोहोळचे माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांना माढा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. बारसकर हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश चिटणीस आणि धाराशिव जिल्ह्याचे निरीक्षक म्हणून काम पाहत होते. त्यांनी आठ दिवसांपूर्वी या पदाचा राजीनामा दिला आहे. मात्र वंचितनं तिकीट दिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातून त्यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीच्या या उमेदवार यादीत सोलापूरमधून राहुल गायकवाड यांना, तर सातारा लोकसभा मतदार संघातून मारुती जानकर यांना उमेदवारी दिली आहे.

**<><><><><><>**

महाराष्ट्रात आजपासून नवीन वीज दर लागू झाले आहेत. इंधन अधिभार जोडल्यावर सुमारे १० टक्के दरवाढीचा बोजा महावितरणच्या ग्राहकांवर पडणार आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या मार्च २०२३ च्या आदेशानुसार ही दरवाढ झाली आहे. दोन वर्षांसाठी दोन टप्प्यांत वीज दरवाढ होईल. घरगुती संवर्गातील सिंगल फेजसाठी पूर्वी ११६ रुपये लागायचे. आता १२८ रुपये

लागतील. थ्री फेजसाठी पूर्वीच्या ३८५ रुपयांऐवजी ४२५ रुपये लागणार आहेत. वाणिज्यिक ग्राहकांना पूर्वीच्या ४७० रुपयांऐवजी ५१७ रुपये द्यावे लागतील.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारात आज नव्या आर्थिक वर्षाची सुरूवात तेजीत झाली. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ३६३ अंकांची वाढ नोंदवत ७४ हजार १५ अंकांवर, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २२ हजार १३५ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ४६२ अंकांवर बंद झाला. दिवसभरात सेन्सेक्सनं एकदा ७४ हजार २५५ अंकापर्यंची ऐतिहासिक उंची गाठली, तर निफ्टीही २२ हजार ५३० अंकाच्या नव्या उंचीवर पोचला होता. पोलाद, सिमेंट, बँकिंग क्षेत्रातले शेअरचे भाव आज वधारले होते. तसंच मुंबई शेअर निर्देशांकात स्थावर मालमत्ता क्षेत्र ४ पूर्णांक १८ टक्कयांनी, दूरसंचार क्षेत्र ३ पूर्णांक ४४ टक्क्यांनी तर धातु क्षेत्रात ३ पूर्णांक ३९ टक्क्यांनी वाढ झाली .

<><><><><>

उमेदवारीसाठी प्रयत्न करण्यात गैर काहीच नाही, पण ज्याला उमेदवारी मिळेल त्याचं काम आम्ही सर्वजण निष्ठेनं करू, असं राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि नाशिकचे पालक मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिकमध्ये बातमीदारांशी बोलत होते. नाशिक लोकसभा मतदारसंघाबाबत ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन यांनी केलेल्या विधानासंदर्भात त्यांनी ही भूमिका स्पष्ट केली.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्सचा सामना राजस्थान रॉयल्सशी होणार आहे. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आज संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

**<><><><><><>**

नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी सोनं तोळ्यामागे चौदाशे रुपयांनी महागलं. २४ कॅरेट सोन्याचे दर आज तोळ्यामागे ६८ हजार ६६० रुपयांवर पोहोचले होते. २२ कॅरेट सोनं ६७ हजार रुपयांवर गेलं होतं. गुड फ्रायडेमुळं ३ दिवस बंद असलेला कमोडिटी बाजार सकाळी तेजीतच खुला झाला. ऑस्ट्रेलिया आणि हाँगकाँग बाजारातल्या तेजीमुळं सोनं प्रति औंस २ हजार २७८ डॉलरपर्यंत पोहोचलं होतं. यामुळं देशातल्या बाजारात सोनं महागल्याची माहिती कमोडिटी बाजाराचे तज्ञ अमित मोडक यांनी दिली.

**<><><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणी आजपासून आपल्यासाठी घेऊन येत आहे**.** संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आजच्या भागात आपण नागपूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत.

**<><><><><><>**

कोकणात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत काल किंचित वाढ झाली. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे तर कोकण, मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी रात्रीचं तापमान किंचित वाढलं आहे. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान सोलापूर इथं ४१ अंश सेल्सियस इतकं नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसांत राज्यातलं हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**//<><><><><><>//**